नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १८० Issue - 180 | वार रविवार दि. १७ नोव्हेंबर २०२४ Blow- Sunday Date 17 November 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### सतत भूमिका बदलतात, इतरांना सल्ला देण्याऐवजी स्वत:चा पक्ष वाढवावा, रामदास आठवलेंचा राज ठाकरेंना टोला

नागपूर : राज ठाकरे सतत भूमिका बदलत असतात. त्यांनी तांच्या पक्षाच्या झेंड्याचा रंगही बदलला. तेव्हा त्यांनी इतरांवर बोलण्यापेक्षा पक्ष वाढवावा. इतरांनी काय करावे यावर उगाच बोलू नये, अशी टीका केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली. विधानसभा निवडणूकीच्या प्रचारासाठी नागपुरात आले असता आठवले प्रसारमाध्यमांशी बोलत होते. काही दिवसांपूर्वी ठाकरे यांनी रामदास आठवले यांच्याप्रमाणे मंत्रीपद मिळत असेल तर मी ते घेणार नाही, उलट माझा पक्षच बरखास्त करेल, असे वक्तव्य केले होते. त्यावरून विचारले असता




आठवले यांनी प्रत्युत्तर दिले. राज यांनी ठाकरे यांनी उगाच पक्ष बरखास्त करण्याची आवश्यक्ता नाही. पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करावे असा सल्लाही आठवले यांनी यावेळी दिला. लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांनी संविधान धोक्यात आहे. आरक्षण संपणार, अशी खोटी आराळी दिली होती. मात्र संविधान बदलले जाणार नाही, आरक्षण संपणार नाही, असा दावा करत विरोधकांकडून मुस्लीम आणि दलित समाजाला भडकवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप आठवले यांनी केला. मी संविधान संरक्षणासाठी मजबूतपणे महायुतीच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. यावेळी आठवले यांनी वंचितचे नेते ड. प्रकाश आंबेडकर वंचिताना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांचा प्रयत्न चांगला आहे. मात्र, पक्षाला मान्यता मिळेल इतकी मत त्यांना मिळत नाही. मागील तीन निवडणुकीत त्यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही. त्यांनी महायुतीसोबत यावे. याशिवाय रिपब्लिकन ऐक्य होत असेल तर त्यांच्या नेतृत्वात आम्ही काम करायला तयार आहोत, असेही आठवले म्हणाले. महायुतीत आम्ही आहोत. काही मिळाले नाही, तरीही आम्ही युतीधर्म पाळतो. महायुतीनेही विचार करावा. दिलेला शब्द पाळावा. हा शब्द न पाळल्यानेच आमचे निकटचे सहकारी भूपेश थुलकर पक्ष सोडून गेले. ते गेले असले तरी आम्ही त्यांना सोडले नाही. मी ज्या पक्षाचा अध्यक्ष होतो, ते त्याच पक्षात आहेत. पत्रकार परिषदेला राजन वाघमारे, बाळू घरडे, डॉ. पूरण मेश्राम, विनोद थूल, अविनाश धमगाये, सतिश तांबे, डॉ. मनोज मेश्राम उपस्थित होते.

# मेडिकल कॉलेजच्या एनआयसीयूमध्ये भीषण आग, दहा अर्भकांचा होरपळून मृत्यू, कुटुंबांच्या किंकाळ्या

## ३७ मुलांना बाहेर काढण्यात यश; काहींची प्रकृती चिंताजनक, बचाव कार्याला अडथळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

झाशी : मेडिकल कॉलेजच्या एनआयसीयूमध्ये शुक्रवारी रात्री उशीरा आग लागल्याने तब्बल १० अर्भकांचा मृत्यू झालाय. मृत्यूंची संख्या अजूनही वाढू शकते असे सांगितले जातंय. ३७ मुलांना बाहेर काढण्यात आले आहे. वॉर्डात ५० हून अधिक बाळ दाखल होती. आगीची माहिती मिळताच जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. ही घटना उत्तर प्रदेशच्या झाशी येथील मेडिकल कॉलेजमधील एनआयसीयूमध्ये घडली. आगीची माहिती मिळताच प्रशासनाकडून बचावकार्य सुरू करण्यात आले. सिलिंडरच्या स्फोटामुळेच ही आग लागल्याचे सांगितले जातंय.



मुख्यमंत्री योगी यांनी अपघाताची दखल घेत अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पोहोचण्याचा सूचना देखील दिल्या. झाशीचे डीआयजी यांनी या अपघाताच्या चौकशीचा बारा तासांमध्येच अहवाल मागवला आहे. वॉर्डाची खिडकी तोडून ३७ बाळांना वाचवण्यात आलंय. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचल्याने मोठी घटना टळल्याचे बोलले जातंय.

या आगीचे काही व्हिडीओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. आगीची घटना कळताच नातेवाईकांनी रूग्णालयाकडे धाव घेतली. यावेळी नातेवाईकांचा एकच गोंधळ बघायला मिळाला. झाशीचे मुख्य वैद्यकीय अधिक्षक सचिन महोर म्हणाले की, 'एनआयसीयू वॉर्डमध्ये एकूण ५४ मुलांना दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते.

अचानक ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरला आग लागली. यावेळी आज विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतू ती आग अधिकच पसरत होती. या घटनेत आतापर्यंत १० बालकांचा मृत्यू आहे. बाकी इतर बालकांवर उपचार सुरू आहेत. ही घटना रात्री १०.३० च्या दरम्यान घडली. घटनेची माहिती लगेचच अग्निशमन दलाला दिली. बालकांना सुरक्षेत बाहेर काढण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात आला. आगीच्या घटनेनंतर अनेक नातेवाईक आपल्या बाळांना घेऊन पळताना दिसले.

### मानखुर्द येथे चांदीचा ट्रक अडवला

## ८० कोटींची आठ हजार ४७६ किलो वजनाची चांदी जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : येत्या बुधवारी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली आहे. या नाकाबंदीदरम्यान मानखुर्द पोलिसांनी शनिवारी वाशी चेकनाका परिसरात चेन्नईहून येणारा एक ट्रक अडवला. या ट्रकच्या तपासणीत आठ हजार ४७६ किलो वजनाची चांदी सापडली असून त्याची तिची किंमत ८० कोटी रुपये असल्याचे म्हटले जात आहे. ट्रकच्या तपासणीत आढळून आलेली चांदी ही हाँगकाँग येथून चेन्नई येथील कंपनीच्या कार्यालयात आणण्यात आली होती. तेथून ती मुंबईत आणण्यात येत होती. घटना उघडकीस आल्यानंतर प्राप्तिकर विभागाचे अधिकारी तसेच अणुशक्ती नगर मतदार संघ १७२ येथील भरारी पथकाला पाचारण करण्यात आले असून ते याप्रकरणी तपास करत आहेत.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्याकरिता त्यांना पैसा, भेटवस्तूंचे वाटप करण्यात येते. त्यामुळे, रोकड, दारू, भेटवस्तू आदींची मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जाते.



हा प्रकार रोखण्याकरिता वाहनांची तपासणी केली जात आहे. मानखुर्द पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधु घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी चेकनाका येथे नाकाबंदी लावण्यात आली. या नाकाबंदीदरम्यान चेन्नईहून मुंबईला येणारा ट्रक पोलिसांनी शनिवारी पहाटे पोलिसांनी अडवला आणि त्याची तपासणी केली. त्यावेळी, ट्रकमध्ये साडेआठ टन वजनाची चांदी आढळून आली. इतक्या मोठ्या प्रमाणात ट्रकमध्ये चांदी आढळून आल्याने त्याची माहिती तात्काळ प्राप्तीकर विभाग व निवडणुक आयोगाच्या पथकांना देण्यात आली. तसेच, पंचनामा केल्यानंतर पुढील कारवाई करिता जप्त केलेली चांदी प्राप्तीकर विभागाकडे सुपूर्द करण्यात आली. या चांदीबाबत आवश्यक ती शहानिशा प्राप्तिकर विभाग व निवडणूक आयोगामार्फत केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# डॉ. आंबेडकरांना भारतरत्न नरेंद्र मोदींनी दिला

### संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वसई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काँग्रेस पक्षाने उपेक्षा केली. डॉ. आंबेडकरांना भारतरत्न पुरस्कार काँग्रेसने नाही तर नरेंद्र मोदी यांनी दिला असा दावा केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केला. महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी शनिवारी सिंग वसईत आले होते.




वसई विधानसभेतील महायुतीच्या उमेदवार स्नेहा दुबे-पंडित यांची जाहीर प्रचार सभा शनिवारी संध्याकाळी वसईच्या दिवाणमान येथील मैदानात संपन्न झाली. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गुजराथचे गृहमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते. आपल्या भाषणात सिंह यांनी काँग्रेस पक्षावर हल्लाबोल केला. काँग्रेस नेते राहुल गांधी आज संविधानाचा आधार घेत आहेत मात्र ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिले त्यांची काँग्रेसने सतत उपेक्षा केली असे ते म्हणाले. डॉ आंबेडकर मुंबईतून निवडणुकीला उभे असताना काँग्रेसने त्यांच्या समोर उमेदवार उभा करून त्यांचा पराभव केला असे ते म्हणाले. काँग्रेस ५२ वर्षे देशात सत्तेवर होती. काँग्रेस बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कार देऊ शकली असती. पण त्यांना भारतरत्न पुरस्कार काँग्रेसने नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला असा दावा त्यांनी केला. बाबासाहेब देश विदेशात ज्या ज्या ठिकाणी राहिले त्या सर्व स्थळांचा पंततीर्थ म्हणून विकास केला असेही सिंह म्हणाले. काँग्रेस अनुसुचित जाती जमातीची जनगणना करण्याची मागणी करत आहे. मात्र कुठल्या जातीला किती आरक्षण देणार हे जाहीर करत नाही. काँग्रेस लोकांची दिशाभूल करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळालं नाही. आता मात्र वातावरण बदलत आहे. हरियाणात पूर्ण बहुमत मिळाले आहे. त्यामुळे राज्यातही महायुतीला पूर्ण बहुमत मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसने गरीबी हटवली नाही. परंतु मोदी सरकाने १० वर्षांतच ३ कोटी लोकांना दारिद्रेषेबाहेर काढले असे ते म्हणाले. २०२७ पर्यंत भारत देश साधनसंपत्तीच्या बाबतीत जगात तिसर्या क्रमांकावर असेल असा दावा त्यांनी केला. राज्यात महाविकास आघाडीच्या हाती सत्ता देऊन मुंबई आणि महाराष्ट्राला एटीएम बनवू देऊ नका असे आवाहन सिंह यांनी केले. यावेळी गुजरातचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी वसईतील गुंडगिरी मोडून काढण्याचे आवाहन केले.

# संपूर्ण राज्यात थंडीला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : विदर्भ वगळता राज्यातील इतर भागात आजदेखील अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्याच्या अधिकांश भागात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे या भागात जाणवू लागलेली थंडी नाहीशी झाली आहे. दरम्यान, रविवारपासून राज्यात पुन्हा एकदा थंडी जाणवू लागेल, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. विदर्भात मात्र गेल्या तीन दिवसांपासून गुलाबी थंडी नाहीशी होऊन हुडहुडी भरवणारी थंडी आधीच जाणवू लागली आहे. त्यामुळे रात्रीच्यावेळी प्रामुख्याने बांधकाम सुरू असणाऱ्या ठिकाणांवर शेकोट्या दिसू लागल्या आहेत.



राज्यात आजदेखील अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. प्रामुख्याने मुंबईसह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर या जिल्ह्यांत ढगाळ वातावरणाचा परिणाम अधिक जाणवत आहे. तर उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक जिल्ह्यात मात्र हा परिणाम जाणवणार नाही. काही ठिकाणी आजदेखील पावसाच्या तुरळक सरींची शक्यता आहे. त्यामुळे ढगाळ वातावरण असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सायंकाळी आणि पहाटेच्या सुमारास जाणवू लागलेल्या थंडीला 'ब्रेक' लागला आहे. या जिल्ह्यांमध्ये कमाल आणि किमान तापमानात पुन्हा वाढ झाली आहे. मात्र, रविवारपासून या भागातील ढगाळ वातावरण निवळेल आणि पुन्हा थंडीची सुरुवात होईल, असा अंदाज आहे. थंडीला परतवून लावणारी कोणतीही स्थिती सध्यातरी म्हणजेच किमान नोव्हेंबरअखेरपर्यंत वातावरणात नाही. त्यामुळे थंडी चांगलीच वाढणार आहे. इकडे विदर्भात गेल्या तीन दिवसांपासून हुडहुडी भरवणाऱ्या थंडीला सुरुवात झाली आहे. सायंकाळपासूनच वातावरणात गारवा जाणवू लागला आहे. रात्री ते पहाटेपर्यंत चांगलीच थंडी जाणवत आहे. विदर्भातील जवळजवळ सर्वच जिल्ह्यातील किमान तापमान १४ ते १७ अंश सेल्सिअसदरम्यान आहे. कमाल तापमान देखील ३० ते ३३ अंश सेल्सिअसदरम्यान आहे. त्यामुळे आता ऊबदार कपड्यांची मागणीही वाढू लागली आहे.

अनेक ठिकाणी ऊबदार कपड्यांची दुकाने लागली असून त्याठिकाणी नागरिकांची गर्दीही वाढायला लागली आहे. त्यामुळे आतापर्यंत ग्राहकांकडे नजर लावून बसलेल्या विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर आता कुठे आनंद दिसू लागला आहे. यात ऊबदार शाल, स्वेटर, मफलर यांची मागणी आहे. या विक्रेत्यांकडे पारंपरिक गरम कपडे मिळत असल्याने त्यातून मिळणारी ऊब पाहता अजूनही लोकांचा कल याच विक्रेत्यांकडे आहे. यंदा उशिराने थंडीला सुरुवात झाली आहे. विदर्भात हुडहुडी भरवणारी थंडी सुरु झाली असून आता संपूर्ण राज्यातच थंडीला सुरुवात होणार असल्याचा हवामान अभ्यासकांचा अंदाज आहे.

### आचारसंहितेचं उल्लंघन!

### मल्लिकार्जून खरगे आणि जे पी नड्डांना नोटीस

# भाजपा आणि काँग्रेसच्या अध्यक्षांना निवडणूक आयोगाकडून नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे. निवडणूक आयोगाने या दोन्ही नेत्यांकडून उत्तरे मागितली आहे. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

भाजपाने राहुल गांधींविरोधात तक्रार केली होती, तर काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. निवडणूक आयोगाने दोन्ही पक्षांकडून सोमवार, १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेपर्यंत उत्तरे मागितली आहेत. स्टार प्रचारक आणि इतर नेत्यांवर वचक ठेवण्याबाबात निवडणूक आयोगाने दोन्ही पक्षांना लोकसभा निवडणुकीवेळीही तंबी दिली होती. याचीही आठवण निवडणूक आयोगाने करून दिली.



भाजपा संविधान नष्ट करणार असल्याचा अपप्रचार काँग्रेसकडून केला जात असल्याची तक्रार भाजपाच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाला केली होती. तर, भाजपाचे दोन ज्येष्ठ नेते विभाजन, खोटे आणि द्वेषपूर्ण भाषण करत असल्याचा दावा करत काँग्रेसने निवडणूक आयोगात धाव घेतली होती. या दोन्ही तक्रारींची दखल घेऊन निवडणूक आयोगाने दोन्ही पक्षांच्या अध्यक्षांना नोटीस बजावल्या आहेत. त्यानुसार, त्यांना १८ नोव्हेंबरपर्यंत उत्तरे पाठवायची आहेत.

दरम्यान, झारखंडमध्ये आणि महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकी लागल्या आहेत. झारखंडमध्ये ३८ जागांसाठी आणि महाराष्ट्रात २८८ जागांसाठी बुधवार २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर, दोन्ही ठिकाणी २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

विधानसभा निवडणूका जाहीर होताच १५ ऑक्टोबर पासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या काळात आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी जिल्हा निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. सत्ताधारी आणि विरोधकांच्या आरोप प्रत्यारोपांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे दिसत आहे. या मिरवणूक, सभा आणि मेळाव्यांमध्ये एखाद्या पक्षाकडून किंवा उमेदवारांकडून आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास याची तक्रार सि-व्हीजील पवर करता येत आहे. प्रचारात काही अनियमितता आढळून आल्यास नागरिक त्या प्रकरणाचा संदेश, फोटो, व्हिडिओ या पवर शेअर करत आहेत. गेल्या काही दिवसात आचारसंहितेचा भंग होण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे. १५ ऑक्टोबर म्हणजेच आचारसंहिता लागू झाल्यापासून ते १४ नोव्हेंबर या महिन्याभराच्या कालावधीत ठाणे जिल्ह्यात १ हजार २०१ तक्रारी या पवर प्राप्त झाल्या आहेत.




## ती मजा काही औरच होती! कालाय तस्मै नम : ....

पंचवीस-तीस वर्षांपूर्वी लग्नसराईत आपल्या गावा- गावातील प्रत्येक रस्त्यांवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत हमखास असे व-हाड वाहून नेणारे ट्रक दिसायचे. अनेकदा नवरा-नवरी ट्रकच्या कॅबिनमध्ये आणि टपावर वाजंत्री, कोणतेही गाव आले की ताशा वाजवायचे. अनेक तरूणांची टपावर बसण्यासाठी ड्रायव्हरबरोबर सेटिंग असायची. आम्हीसुद्धा कितीतरी वेळा लग्नमालकाने, 'बसून घ्या, बसून घ्या' असे सांगूनही ट्रकच्या बाजूला उभे रहायचे व ट्रक सुरू होताच टपावर जायचे. टपावर बसणारेच अनेकदा, 'कोणीही टपावर बसू नका..' असे दरडावून सांगायचे. अनेकदा झाडांच्या फांद्यानी कपाळमोक्षही घडायचा. पण टपावर बसून केलेल्या हवेशीर प्रवासाची सर आजच्या उगाडीतील प्रवासालाही नाही. आता कोणी व-हाडासाठी ट्रक सांगतही नाही..आणि टपावर तर कोणीच बसणारही नाही...

**ती मजा काही औरच होती! कालाय तस्मै नम:....**

# एक भाकरी तीन चुली

## खाकीतला खमक्या अधिकारी, पण मला हळवं करून सोडलं असं भयाण समाजवास्तव, परखडपणे मांडणारी कादंबरी म्हणजे एक भाकरी तीन चुली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

एक भाकरी तीन चुली ह्या कादंबरीचे सर्वांचे आवडते व ज्यांच्या लेखनशैलीत अप्रतिम असे भाव दडलेले आहेत, असे आदरणीय देवा झिंजाड सर सर्व प्रथम मानाचा मुजरा =ज

एक भाकरी तीन चुली ही कादंबरी समाजातील सत्यघटनेवर आधारित असल्याने अगदी अल्प कालावधीत खूप लोकप्रिय झाली.मला पण माझ्या अगदी जवळच्या नातेवाईकांकडून समजल्यावर मी वेळ दवडता आपल्याशी संपर्क साधला असता, आपण स्वतःच फोनवर बोलल्यावर मन खूप आनंदी झाले.एक भाकरी तीन चुली ही कादंबरी उपलब्ध झाल्याने मी लगेच वाचनास सुरूवात केली व अगदी थोड्या कालावधीत वाचन पूर्ण केले.कारण कादंबरीतील लेखन इतके सुंदर व सुरेख शब्दांकन केले असल्याने पुस्तक खाली ठेवूच वाटेना.

आपण कादंबरीत त्या काळी समाजात स्त्रीयांवर होणारे अत्याचार, अन्याय, दवाखान्यांची सुविधा नव्हती म्हणून कित्येक बाळांतपणे घरीच, झोपडीत होत असत.असुविधा असल्याने बर्याचदा बाळाचा किंवा आईचा मृत्यू होत असे.जर मुलगी झाली तर घरच्यांकडून होणारा अपमान, पावलोपावली हिनवणे, पांढऱ्या पायाची, अपशकूनी अशी टोमणे सतत ऐकावी लागत असत.

मुलगी दहा/बारा वर्षांची झाली की अगदी कोवळ्या वयात तिचे खेळण्या बागडण्याचे वय असतांनाच, तिला पदर पण आलेला नसतांना, तिला एखाद्या आडदांड किंवा वयस्कर पुरूषाशी लग्न लावून मृत्यूच्या खाईत लोटून आपली जबाबदारी पार पाडली या तोर्यात मिरवणारी पुरुष प्रधान संस्कृती =इह्न

कोवळ्या वयात लग्न झाल्यावर जर दुर्दैवाने एक ते दीड महीन्यात ती मुलगी विधवा झाल्यावर सासरकडील मंडळी तू पांढऱ्या पायाची, अपशकूनी आहेस असे हिनवून तिला कायमचे माहेरी पाठवून देणे, परत त्या बिचारीला संपूर्ण आयुष्य रांडव म्हणून जगणे,कारण दुसरे लग्न करण्याची परंपरा त्या काळी समाजात नव्हती.जर दुसरे लग्न केलेच तर भाऊबंद तिच्या घरच्यांना वाळीत टाकण्याची भिती.

समाजातील काही विकृत, आडदांड मंडळी भेटेल तिथे वाईट नजरेने बघणे, अनैतिक संबंध जुळवण्यासाठी तिचा छळ करणे, शुभ कार्यात सहभागी न होऊ देणे, दिवस रात्र फक्त राबराब राबणे हेच तिच्या नशिबी असते.

नवर्या बरोबर नांदत असेल तर सासू सासरे किती अश्लील शिवीगाळ करून त्रास देत असत, यासर्व अन्यायाचे उदाहरण म्हणजे सासरा रंग्या व बिचारी पारू यांच्याबाबत लिखाणात दिसून येते.

माझा जन्म पण याच काळात झाल्यामुळे कादंबरीत केलेले वर्णन मी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितले असून अनुभवले आहे.त्यामुळेच वाचन करताना मन व्याकूळ होऊन मी अक्षरशः त्या काळात वावरतो असा भास होत होता व मनाला अत्यंत वेदना होत होत्या व त्या काळातील पुरुष प्रधान संस्कृतीची घृणा वाटायला लागली आहे.

अर्थात मी पण काही अंशी पुरुष प्रधान संस्कृतीला तेवढाच जबाबदार आहे असे म्हटले तर काहीच वावगे ठरणार नाही.

एक भाकरी तीन चुली या कादंबरीत रंग्याची व्यक्तीरेखा इतकी कडवट व तंतोतंत रेखाटली आहे.तसेच ग्रामीण भागातील आडदांड बोलीभाषेचा वापर वाचतांना गोड, मवाळ व आपलेपणाची जाणीव करून देणारी आहे.त्याकाळात बहुजन समाजातील जातीभेद किती विकोपाला गेला होता गेला होता.तसेच शिक्षणाचा अभाव याचे हुबेहूब वर्णन मनाला खूप भावते.

पारू ची व्यक्तीरेखा तर इतकी हृदयद्रावक साकारली आहे की वाचन करताना अक्षरशः मन गहीवरून येते व नकळत डोळ्यांच्या कडा ओल्या होतात.यावरून आपल्या लेखणीची धार किती तीक्ष्ण व धारदार आहे,याचा परिचय येतो.

पारूचा जन्म माळरानावर झाला, मुलगी झाली म्हणून सासरा रंग्याने सुनेला घरात न घेतल्याने गुरांच्या काळ्याकुट्ट अंधारात बाळाला (पारू)बारदानात गुंडाळून रात्र काढणे, वयाच्या १० व्या वर्षीच एका लंगड्या, वयस्कर पुरूषाशी घरात विरोध असताना पैसे घेऊन रंग्याने जबरदस्तीने लग्न लावून देणे,एका महिन्यात पारूच्या नवर्याचा मृत्यू होणे,सासरच्या मंडळींकडून तू पांढऱ्या पायाची, अपशकूनी असून नवर्याला खाल्लस असे हिनवून माहेरी कायमचे हाकलून देणे, माहेरी रंग्या(आजोबा) दारूला दिवसरात्र अश्लील शिवीगाळ करणे, तू पांढऱ्या पायाची आहेस,घरात राहू नकोस असा रट्टा लावणे, भाऊबंदांनी पण हिला घरातून हाकलून द्या, नाहीतर हिच्यामुळे आमच्या मुलींचे लग्न होणार नाहीत असा आग्रह धरणे एवढा त्रास पारू मुकाट्याने सहन करत होती.शेवटी रंग्याने दुसर्या लग्नाची परंपरा नसताना समोरच्या कडून भरपूर पैसा मिळाल्याने गंधर्व (लग्न) लावून दिले.

पारूला नशीबवाने नवरा व सासू खूप श्रीमंत व मायाळू असल्याने कुठे तरी पारूच्या नशीबात सुखाचे दिवस आले होते.पारूला चार मुले झाल्यावर सासू वयोमानाप्रमाणे मृत्यू पावणे, थोड्याच दिवसात बैल पोळ्याच्या दिवशी नवरा पण मृत्यू पावणे,परत तिच्या भाग्याचा कुंकू पुसणे,दीर पण आजारी असल्याने मृत्यू पावणे,पारू दिसायला खूपच गोरीपान व सुंदर असल्याने तिचा सख्खा चुलत दीर त्यांच्याशी अनैतिक संबंध ठेवण्यासाठी तिचा छळ करणे, किरकोळ कारणावरून तिला व तिच्या मुलांना मारहाण करीत असे.तिचे जगणे मुश्कील केले होते.तरी पण पारू त्यांच्या आहारी गेली नाही.शेवटी दीराने मुलांना वाचवायचे असेल तर तू हे घर सोडून निघून जा,असा आग्रह केल्यावर बिचारी पारू नाविलाजाने मुलांना सोडून निघून गेली.

माहेरी गेल्यावर परत पूर्वीसारखेच रंग्याचे व भाऊबंदकीचे अश्लील शिवीगाळ व टोमणे सहन न झाल्याने बिचारी पारू पहाटेलाच फक्त एक साडी घेऊन घरातून निघून गेली.कुठे जायचे काहीच माहीत नाही.पण म्हणतात ना जिथे चोच दिली तेथे चारा पण दिला चालत चालत एका नंदीबैल पालातील कुटुंब व एका मुस्लिम कुटुंबाला तिच्या परिस्थितीची जाणीव झाल्याने त्यांच्या आग्रहाने मुक्काम करून शेवटी एका पाटाच्या कामावरील स्टॉफचा स्वयंपाक करण्याचे काम तिला मिळाले.पण ती विधवा व दिसायला सुंदर असल्याने तेथील सुपर वॉयझरने अनैतिक संबंध ठेवण्यासाठी प्रयत्न करूनही पारू दाद देत नाही, म्हणून एके दिवशी सायंकाळी स्वयंपाक करून घरी जात असताना रस्त्यात अडवून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला असता तिने त्यास चांगलाच चोप दिला व तेथून पळ काढला व नाविलाजाने काम सोडून दिले.

पारूला ज्या मावशीने स्वयंपाकाचे काम देऊन आपल्याच घरात राहायला सहारा दिला होता,त्याच मावशीने तिच्या ओळखीच्या रामा याच्याशी दोघांच्या सहमतीने तिसरे गंधर्व (लग्न) लावून दिले.दोघे नवरा बायको सुखाने संसार करू लागले.सहा वर्षांनी मुलगा झाला. परंतू दुर्दैवाने मुलगा लहान असतानाच रामाचा मृत्यू झाला.परत बिचारीचा कुंकू पुसला गेला.परत पारूच्या नशीबात मोलमजुरी आली.कधी कधी देवसुद्धा किती निर्दयी याचं जीवंत उदाहरण होय.

पारू तरीसुद्धा वाघिणीसारखी भाऊबंद, शेजारी पाजार्यांची बोलण्याकडे लक्ष न देता मुलाला शिकविले.पण हार मानली नाही.कधी कधी उपाशी राहून दिवस काढले,पण मुलाला आठवीपर्यंत शिकवले.स्वाभिमान, जिद्द व अडाणी असूनसुद्धा हार न मानता ताठ मानेने जीवन जगली.एक स्त्री काय करू शकते याचे जीवंत उदाहरण म्हणजे पारू हिचा अभिप्राय आपण समाजापुढे हूबेहूब आपल्या धारदार लेखनशैलीतून साकारले आहे.

पारू म्हणजे एक भाकरी तिला दुर्दैवाने तीन लग्न करावे लागले, म्हणजेच तीन नवर्यांचे तीन घरे म्हणजेच तीन चुली हे कादंबरीचे शीर्षक खूपच छान व अर्थपूर्ण आहे.

प्रत्येकाने ही कादंबरी वाचा म्हणजे वाचाच, तुम्हाला जगण्याचा अर्थ नक्कीच सापडेल.

जय हिंद!!

**प्रभाकर पवार**
**(सेवानिवृत्त माजी सैनिक व माजी पो. अधिकारी)**
९८९०६९७०९८

## औदयोगिक क्षेत्रातील कंपन्यामधील कामगारांनी मतदान करण्यासाठी जनजागृती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका ) : सोलापूर महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर व इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभूर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रातील कंपन्यामध्ये जाऊन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने कंपनीमधील कामगारांनी आपल्या कुटुंबियांसह २० नोव्हेंबर रोजी देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान करावे असे आवाहन करण्यात आले.

टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात जनजागृतीसाठी औदयोगिक क्षेत्रातील कंपनी व्यवस्थापनाने उस्फूर्तपणे प्रतिसाद देऊन सहकार्य केले.

यावेळी कामकारांनी मतदान करणेची प्रतिज्ञा घेतली. इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभुर्णी यांच्या वतीने टेभुर्णी औदयोगिक क्षेत्रात कामकागांनी मतदान करण्यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी मुख्य चौकाचौकात बॅनर्स लावणेत आले आहेत.

या प्रसंगी एमआयडीसी चे स्वीप कोअर समिती सदस्य, इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ टेभुर्णी चे अध्यक्ष, सचिव व असोसिएशन चे इतर सदस्य या उपक्रमात सहभागी झाले होते.

## कोणीही हुरळून जाऊ नका....? नाही तर हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागे... अशी अवस्था होईल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी /अमर जाधव

औसा तालुक्यात सध्या विधानसभेची निवडणूक अटीतटीची आहे. म्हणजेच कांटे... की टक्कर कोणत्याही उमेदवाराला विक्रमी मताधिक्य मिळणार नाही आशी सामान्य जनतेत चर्चा आहे. कारण....!. औसा तालुक्याच्या गावगावातील वातावरण काय सांगतेय...? याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. पण कधी कोण म्हणतय आमदार अभिमन्यू पवार निवडणूक जिंकतील..., तर कोणी सांगतय ..!.माजी आमदार दिनकर माने निवडून येथील.....! तर कोणी म्हणतय शिवाजी कुंभार निवडणूक जिंकतील..! जो व जसा माणूस येईल तसा मतदार राजा वागताना पहायला मिळत आहे. फक्त सभा मोठ्या झाल्या... आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते... म्हणून कोणीही हुरळून जाऊ नका....? नाही तर हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागे.....आशी अवस्था होईल...!. ही सुज आहे (एखादी हातावर जखम झाल्यावर हाथ सुजतो, म्हणून कोणी पैलवान होत नाही ) अशी तालुक्यातील जनतेतून बोलले जाते., आज

प्रत्येक उमेदवार पेडन्युज च्या मागे धावताना दिसतोय (पैसे देऊन आपल्या बातम्या प्रसिध्द करणे) या साठी झटताना पहायला मिळतात. लातुर चे गुलाबी गालाची माणसं आली आणि बाईट घेऊन गेले.... म्हणून कोणीही निवडणूक जिंकेल आसे नाही. त्याचे एकच लक्ष, पाकिट फिक्स..!... कारण लातुर वाला मतदार नाही...? कारण त्याला मतदानाचा हक्क औसा तालुक्यात नाही... याचे उमेदवार यांनी भान ठेवा..?.

कोणी व कोणत्या पत्रकार व संपादक यांनी कुठली बातमी लावायची व कोणते हेडिंग टाकायचे हे ही हेच महाभाग ठरवतात.... यासाठी अनेक संस्था व पेट्रोलियम पंपावरील कामगार आपली लाचारी कशी आसते ते दाखवताना पाहून स्वाभिमानही आपण कसा घाण टाकतो याचे सर्कस पहायला मिळतात..... पॅकेज द्यायचे व बातम्या मिळवायची कला यांना मनी पावर मुळे आवगत झाली. पण बातम्या आल्या म्हणून मतदारांना विसरु नका.. नाही तर ना घरका ना घाटका अशी अवस्था होईल... पैशाचा माज जास्त वेळ चालत नाही.... नाहीतर पैसे वाल्यांनी पंतप्रधान पद विकत घेतले आसतं....! निवडणूक झाल्याच नसत्या दे पैसे घे पद, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत अधिकार दिला आणि जनसामान्यांना पद भुसवण्याचा समान अधिकार व मतदानाचा हक्क दिला धन्य ते आंबेडकर...!

## राज्य उत्पादन शुल्क विभाग यांची कामगिरी; २ लाख ९२ हजार ५०० रुपयांची दंडात्मक कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विधानसभा निवडणूक २०२४ पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची सागर धोमकर विभागीय उपायुक्त पुणे विभाग याच्या निर्देशानुसार श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर एस आर पाटील उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर याचे मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची सोलापूर शहर व जिल्हयामध्ये दि. १३ नोव्हेंबर २०२४ रोजी मौजे मुळेगाव तांडा बक्षी हिप्परगा वरळेगाव तांडा शिवाजीनगर तांडा परिसरात कारवाई करून अवैध हातभटटी दारू निर्मिती केंद्रावर कारवाई करून या कारवाईत एकुण ११ हजार ४५० लीटर रसायन ५७५ लीटर हातभटटी दारू असा एकुण रूपये ७ लाख १४ हजार ९९५ चा प्रोव्हीबिशन गुन्हयातील मुददेमाल जप्त करण्यात आला.

तसेच या विभागाकडुन अवैध विनापरवाना मद्य पिण्यास परवानगी देण्याऱ्या आठ ढाब्यांवरती कारवाई करून ब्रीथ नलायझर चा वापर करून वैद्यकीय चाचणी नंतर सदर आठ मातोश्री ढाबा, दुर्गा ढाबा होटगी रोड, जयभवानी ढाबा मंगळवेढा रोड, सावजी कोल्ड्रिंक्स, कन्ना चौक, तसेच पंढरपुर कासेगाव येथील साईराजे, महाराजा ढाबा, तारापूर, माढा येथील राणा ढाबा, माळशिरस येथील सावनी ढाबा, यावर कारवाई करून ढाबा मालक व मद्यपी ग्राहकांना मा. न्यायालयासमोर हजर केले असता ढाबा मालकास प्रत्येकी रूपये २५ हजार व मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी रूपये ३ हजार इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून एकुण रूपये २ लाख ९२ हजार ५०० इतका दंड जमा करून घेण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारे अवैध ढाब्यांवर कारवाई यापुढे अशीच चालू राहणार आहे. परवाना नसणाऱ्या ठिकाणी मद्य प्राशन केल्याने संबंधित जागा मालक व मद्यपी या दोघांवर कारवाई होऊ शकते याची नोंद संबंधितानी घ्यावी.

आचारसंहिता कालावधीमध्ये दि १५ ऑक्टोबर २०२४ ते दि. १३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर शहर व जिल्हयात एकुण २५९ गुन्हे नोंद करण्यात आले असून २५७ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कालावधीत केलेल्या कारवाईत ९१ हजार २३० लीटर गुळमिश्रित रसायन, ७ हजार ७८८ लीटर हातभटटी दारू, १ हजार ६७१ लीटर ताडी, ९४३ ब.ली. देशी दारू, ६१८ लीटर विदेशी दारू, ७७.९७ ब.लीटर बिअर ८३.८८ ब.ली. बनावट विदेशी मद्य व ५९ वाहनासह एकुण १ कोटी ४२ लाख २१ हजार ३४४ इतका मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई निरीक्षक श्री.आर.एम.चवरे, श्री.जे.एन.पाटील, श्री.अे.व्ही.घाटगे, श्री.डी.एम.बामणे श्री. पंकज कुंभार, श्री भवड, तसेच दुय्यम निरीक्षक श्री.एस.डी.कांबळे, श्री आर एम कोलते, श्री धनाजी पोवार, श्री समाधान शेळके, श्री सुखदेव सिद, श्रीमती अंजली सरवदे, सचिन गुठे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक श्री. मुकेश चव्हाण, श्री मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, गुरूदत्त भंडारी, आनंद जोशी, जवान सर्वश्री आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपुरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, इस्माईल गोडीकट, कपील स्वामी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, विकास वडमिले, विजय शेळके, योगीराज तोग्गी, तानाजी जाधव, रेवणसिध्द कांबळे वाहनचालक रशीद शेख, दिपक वाघमारे व संजय नवले यांनी पार पाडली. अवैध मद्यविक्री, अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस प क्रमांक ८४२२००११३३ या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

## मतदानासाठी लऊळ येथे स्वीप मल्टीमीडिया व्हॅनची जनजागृती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका ) : सोलापूर विधानसभा निवडणूकीमध्ये लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे याबाबत जनजागृतीसाठी केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या स्वीप मल्टीमीडिया व्हॅनचे माढा तालुक्यातील लऊळ येथे उत्साहात करण्यात आले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवणे आणि नव मतदारांना मतदान करण्याकरिता प्रेरित करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या स्वीप मल्टीमीडिया व्हॅनच्या माध्यमातून जिल्ह्यात जनजागृती सुरू आहे.सदर व्हनचे माढा तालुक्यातील लऊळ येथे उत्स्फुर्तपणे स्वागत करण्यात आले.यावेळी बी.एल.ओ.शैलेश घुगे , माडेकर , कारंडे , बाजीराव ढोरे , सोमनाथ भोंग ,प्रभारी केंद्रप्रमुख सूर्यकांत लोकरे, अंगणवाडी सेविका काजल कांबळे अंगणवाडी सेविका छाया लोंढे , श्रीमती मांदे मदतनीस उषा चव्हाण , श्रीमती डोरे , आशा वर्कर श्रीमती कोकाटे आशा सेविका मुजावर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी व ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थ हजर होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### चोरट्याने शर्टाच्या खिशातून मोबाईल पळाला

सोलापूर, प्रतिनिधी) : सोलापूर मार्केट यार्ड येथे कांदा उतरवण्यासाठी लाईन मध्ये उभा असलेल्या तरुणाच्या खिशातील मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री घडली. याप्रकरणी प्रकाश नरसु पवार (वय-३४,मु.पो.अकोले,मंद्रूप) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बाबर हे करीत आहेत.

### आयोध्या नगरीत घर फोडून दागिने लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : हैदराबाद रोडवरील आयोध्या नगरी येथील एका घरातील मंडळी बाहेरगावी गेलेले असताना त्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटा मधील ६० हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान आयोध्या नगरी हैदराबाद रोड येथे घडली. याप्रकरणी लता मारुती डोईजडे (वय-६५,रा.आयोध्यानगरी हैदराबाद रोड, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शिवशरण हे करीत आहे.

# अभिजीत आबांना मतदान म्हणजेच शिवबाबांना मतदान : स्वरूपाराणी मोहिते-पाटील

## पंढरपूर आणि माळशिरस तालुक्यातील गावातून ४० हजारांची लीड अभिजीत पाटील यांना मिळेल : शिवतेजसिंह मोहिते-पाटील





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ बोरगाव येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना स्वरूपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या की; राज्यातील दडपशाहीचे राजकारण नागरिकांना मान्य नाही. लोकसभा निवडणुकीत अभिजीत पाटील यांच्यावरही दबाव टाकण्याचे काम झाले. मात्र महाविकास आघाडीने सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानत आपल्या जाहीरनाम्यात विविध योजनांचा समावेश केला आहे. नागरिकांनी आपल्या हक्काचा माणूस म्हणून धैर्यशील मोहिते-पाटील यांना निवडून दिले. त्याच पद्धतीने दूरदृष्टी ठेवून प्रगतीसाठी आणि स्वच्छ कारभारासाठी आबांना मतदान म्हणजेच शिवबाबांना मतदान असे सांगत अभिजीत पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना शिवतेजसिंह मोहिते पाटील म्हणाले की या मतदारसंघात लोकप्रतिनिधींनी कोणतेही विकास काम केले नाही. सत्ता असो किंवा नसो विजयसिंह मोहिते-पाटील यांनी या मतदारसंघात काम केले आहे. पंधरा वर्षाचा बॅकलॉक भरून काढला आहे. यामुळे माळशिरस तालुक्यातील १४ गावांनी कायम मोहिते पाटील कुटुंबीयांवर प्रेम केले आहे. मी निवडणूक लढवण्यास इच्छुक होतो मात्र मोठ्या दादांनी आणि शरद पवार साहेबांनी आम्हाला आदेश दिला की अभिजीत पाटील यांच्या पाठीशी उभे राहावा. या आदेशाचे पालन करून आम्ही अभिजीत पाटील यांचा जोरदार प्रचार करत आहोत. पंढरपूर मधील ४२ गावांमधून

**बोरगाव येथे अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा संपन्न**

अभिजीत पाटील यांना २५ ते ३० हजार आणि माळशिरस तालुक्यातील गावांमधून बारा हजाराहून अधिक मताधिक्य मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की; राज्यात शरद पवारांनी परिवर्तनाचा एल्गार पुकारला याला साथ देऊन विजयदादांनी क्रांतीकारक निर्णय घेऊन लोकसभा निवडणुकीत यश मिळवले त्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पक्ष फोडीचे राजकारण झाले. चिन्हही काढून घेतले. या दडपशाहीच्या विरोधात आपल्याला काम करायचे आहे. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर सर्व घटकातील नागरिकांना न्याय देण्यासाठी पंचसूत्री योजना राबवण्यात येणार आहे. माढा मतदार संघात तीस वर्षात काय विकास केला असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगाराची सोय नाही. मतदार संघातील मूलभूत विकास होऊ शकला नाही. यासाठी काम केले पाहिजे. मतदारसंघात केळी संशोधन केंद्राची गरज आहे. माढा, मोडनिंब, करकंब, महाळुंग साठी निधी मिळवून देऊ, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊ, असा विश्वास देत त्यांनी दूध संघ बंद करून जागा विकल्या. शेतकऱ्यांच्या उताऱ्यावर कर्ज काढले अशी टीका अपक्ष उमेदवार रंजित शिंदे यांच्यावर केली.

यावेळी त्यांनी मी मोहिते-पाटील यांच्या विचारावर काम करेन मी आमदार होणार नसून शिवतेजसिंह मोहिते-पाटील आमदार होणार आहेत असा विश्वास दिला.

# प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांची नागेश फाटे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी आज शुक्रवारी पंढरपूर येथे प्रचारसभा निमित्ताने आले असता,उद्योग व व्यापार विभागचे प्रदेशाध्यक्ष नागेशदादा फाटे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

जयंतराव पाटील हे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचारार्थ पंढरीत जाहीर सभेसाठी आले होते. सभा संपताच पाटील यांनी भेट दिली आहे.

नागेशदादा फाटे यांनी पाटील यांना यथोचित स्वागत केले. यावेळी उपस्थित मान्यवरासमोर नागेशदादा फाटे यांच्या पक्षकार्य पद्धतीबाबत विशेष कौतुक केले.

या भेटीप्रसंगी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिलदादा सावंत, सोलापूर जिल्ह्याचे कार्याध्यक्ष रविकांत पाटील, पंढरपूर तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे राज्य सरचिटणीस अरुण आसबे, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष सागर पडवळ, उद्योजक रवी सावंत, तसेच डॉ. रमेश फाटे यांच्यासह पक्षाचे



अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

जयंतराव पाटील यांनी नागेशदादा फाटे यांच्या नेतृत्वाखाली उद्योग व व्यापार विभागाचे प्रगती आणि कार्यकर्त्यांच्या समन्वयासाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत, त्यांचा सन्मान केला.

या प्रसंगी नागेश फाटे यांना जयंतराव पाटील यांच्या गाडीचे सारथ्य करण्याचा सन्मान मिळाला. ही बाब त्यांच्या कार्याची दखल घेतली गेल्याचे प्रतीक ठरली. प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी आमच्या कार्यालयास दिलेल्या सदिच्छा भेटीबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. पक्षाच्या विचारधारेसाठी काम करताना साहेबांकडून मिळणारे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन ही माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी मोठी प्रेरणा आहे. साहेबांनी माझ्या निस्वार्थ कार्याची दखल घेतली आणि गौरवोद्गार काढले, यामुळे माझ्यावर अधिक जबाबदारी आली आहे, असे मत यावेळी नागेश फाटे यांनी व्यक्त केले.



# विकासाची दृष्टी नसणाऱ्यांना विकास निधीचे महत्व कसं कळणार : आ. समाधान आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मी राजकारणात केवळ आमदारकीसाठी आलो नाही तर तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून दुष्काळी तालुका हा कलंक पुसण्यासाठी आपली सेवा करण्यासाठी आलो असल्यामुळे मी हजारो कोटींचा निधी आणू शकलो परंतु झालेल्या विकास कामांच्या निधीवर अर्थहीन भाष्य करणाऱ्यांना विकासाची कोणतीही दृष्टी नसल्यामुळे त्यांना विकास निधीचे महत्व कसं कळणार असा टोला पंढरपूर मंगळवेढा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा व महायुतीचे उमेदवार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आमदार समाधान आवताडे यांच्या प्रचारार्थ बुधवारी या ब्रह्मपुरी, उचेठाण, बठाण, मुढवी, धर्मगांव, ढवळस, शरदनगर, देगांव, घरनिकी या गावांमध्ये प्रचार सभा पार पडल्या त्यावेळी ते बोलत होते.



पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या अगोदर निवडणुका जवळ आल्या की, दुष्काळ व पाणी प्रश्नावर बोलले जात होते. परंतु मी आमदार झाल्यापासून पाण्याच्या जवळपास सर्व योजना पूर्णत्वास नेल्या आहेत. मी फक्त बोलत नाही तर ते करूनच दाखवतो. येत्या वर्षभरात राहिलेली सर्व विकास कामे पूर्ण होतील आणि आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण आणि परिपूर्ण विकास झाल्याचे चित्र आपणा सर्वांना पहावयास मिळेल. त्याचबरोबर राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्यामुळे राहिलेल्या सर्व विकास प्रकल्पांची ही कामे गतिशील मार्गाने पूर्ण होतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सदर सभेप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अजित जगताप यांनी बोलताना सांगितले की, गेल्या पन्नास वर्षात आपल्या मतदारसंघाचा विकास खुंटला होता. त्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी आपल्या मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून अतोनात प्रयत्न केले आहेत. विकासाच्या वाटेवर चालणारा एक लोकप्रतिनिधी या नात्याने आपण सर्वांनी त्यांना आमदार करण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सभेसाठी दत्तात्रय जमदाडे, प्रकाश गायकवाड, रयत क्रांती संघटनेचे दीपक भोसले, उद्योजक रामचंद्र सलगर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्याध्यक्ष रामेश्वर मासाळ, माजी संचालक सुरेश भाकरे, संचालक अशोक माळी, राजन पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष औदुंबर वाडदेकर, रुक्मिणी दोलतोडे, शिवसेना तालुकाप्रमुख अशोक चौंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य सतीश मोहिते, माजी सरपंच दत्तात्रय नवत्रे, युवराज शिंदे, संभाजी घुले, दिगंबर यादव, विश्वनाथ हेंबाडे, सचिन हेंबाडे भाजपा महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मतदार जनजागृती फेरीचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली.

येत्या विधानसभा निवडणुकीत मतदानाची जास्तीत जास्त टक्केवारी वाढणे यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत निवडणूक आयोगाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे .त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण गावातून घोषणा देत विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती फेरी काढली. विद्यार्थ्यांच्या हातात मतदान विषयक घोषणा देणारे फलक दिसून आले.मतदार राजा जागा हो- लोकशाहीचा धागा हो,मतदानासाठी वेळ काढा-आपली जबाबदारी पार पाडा, चला मतदान करू या- लोकशाही रुजवू या घोषनांनी गाव व परिसर दुमदुमाला. ठिकठिकाणी गावातील ज्येष्ठ नागरिक ,तरुण, महिला व नवमतदार यांना जनजागृती फेरीमध्ये सहभागी करून घेण्यात आले. रॅलीत शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,विठ्ठल तात्या वामने,श्रीमंत पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरुण वारुंगसे,माजी सरपंच शरद माळी, अर्जुन वाजे,अण्णासाहेब वारुंगसे,मोहन माळी,सुनिल ढोली आदींनी सक्रिय सहभाग घेतला.

येत्या विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेऊन मतदानाची टक्केवारी वाढवावी असे आव्हान यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे, शाळाबाह्य उपक्रम समिती प्रमुख सोमनाथ गिरी मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे,पी.आर.करपे, केंद्रस्तरीय मतदान नोंदणी अधिकारी सोमनाथ गिरी,डोंगरसिंग रबडे, शिवाजी गुरूळे , कचेश्वर शिंदे,पोलीस पाटील प्राध्यापक रामदास वारुंगसे, मारुती डगळे, सोमनाथ पगार,सुनील ससाने ,व्ही. टी. देवरे,ऋषिकेश कुंदेआदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

**८५ वर्षांवरील ४०९ मतदारांचा तर ३८ दिव्यांग मतदारांनी केले मतदान**

**कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये असा उद्देश**

# पंढरपूर विधानसभा मतदारसंघात ४४७ मतदारांनी केले गृह मतदान : निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. याच अनुषंगाने पंढरपूर विधानसभा मतदारसंघात यंत्रणेने नागरिकांच्या घरी जाऊन मतदान घेतले. मतदारसंघात एकूण ४४७ मतदारांनी गृह मतदान करून समाधान व्यक्त केले. यात ८५ वर्षांवरील ४०९ मतदारांचा तर ३८ दिव्यांग मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व सूक्ष्म निरीक्षक यांचा समावेश असलेल्या २० पथकांच्या माध्यमातून गृह मतदान मोहीम राबविण्यात आली होती. असेही निवडणूक निर्णय अधिकारी श्री इथापे यांनी सांगितले.

**पंढरपूर विधानसभा मतदारसंघात दि.१४ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत गृह मतदान घेण्यात आले.गृहमतदानासाठी नमुना १२ डी भरून घरूनच मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.**







# विठू माऊलीच्या गजरामध्ये बोपगाव येथे काकड आरती सांगता : डॉ विनायक गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर /प्रतिनिधी : उठा पांडुरंगा आता दर्शन द्या. उठा सकळ जन उठले नारायण. संपूर्ण महाराष्ट्र मध्ये विशेषता शुक्ल एकादशी कार्तिक महिना ते त्रिपुरी पौर्णिमा कार्तिक महिना या कालावधीमध्ये बहुतांश विठ्ठल मंदिरातून पहाटेच्या वेळी काकड आरती केली जाते.



त्याचप्रमाणे पुरंदर तालुक्यातील बोपगाव मध्ये ही संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ बोपगाव यांचे सर्व सहकारी ग्रामस्थ,महिला,पुरुष,नित्यनेमाने भल्या पहाटे काकड आरतीला उपस्थिती दाखवतात.संत एकनाथ महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या आरत्या, अभंग,भजन,गवळणी,भल्या पहाटे सुमधुर आवाजाने गावाचा संपूर्ण परिसर भक्तीमय होतो.स्वतःच्या आईंदी,आळशी,आणि चैनी, वृत्तीला काकड्याच्या रूपाने जाळून टाकणे ही त्या मागची भावना आहे असे मानले जाते.

त्रिपुरा पौर्णिमेच्या पहाटे संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ ग्रामस्थ महिला भगिनी यांनी गावांमधून दिंडी काढून विठ्ठल नामाच्या गजरामध्ये काकड आरतीची सांगता केली. गेली पंधरा दिवस ह भ प अनिल महाराज घिसरे,बाळासाहेब फडतरे सर,सुनील महाराज फडतरे,शिवाजी आबा जगदाळे,सुनील आण्णा फडतरे,पुरोहित प्रशांत गुरव,माऊली कदम,मस्कु दादा फडतरे,काशिनाथ फडतरे,अतुल महाराज फडतरे,ज्ञानेश्वर बापू फडतरे,लक्ष्मण काशिनाथ फडतरे,गोपाळ नाना जगदाळे,तसेच महिला भजनी मंडळ या सर्वांनी रोज पहाटे सुंदर अशी भक्ती मय सेवा केली. सर्व भजनी मंडळाचा यावेळी सन्मान केला नंतर महाप्रसादाने काकड आरतीची सांगता झाली.

## थोडक्यात...




### महिलेच्या पर्समधून चाळीस हजारांचा ऐवज केला लंपास

सोलापूर : विजापूर रोड येथील सुंदर मल्टीपर्पज हॉल येथून महिलेच्या पर्समधून ॲपल कंपनीचा मोबाईल, सॅमसंग कंपनीचे कीपॅड, चांदीचे दोन तोळे वजनाचे कडे, रोख रक्कम पाच हजार रुपये आणि एक हजार रुपये असलेली पाच बंद पाकीटे असा ३९ हजार पाचशे रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ नोव्हेंबर रोजी सात ते पावणे दहाच्या सुमारास घडली. याप्रकरणी सुनंदा बाबुराव कोरे (वय ५८, रा. श्रीनगर बार्शी रोड, लातूर) यांनी विजापूर नाका पोलिसांत फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करीत आहेत.

# जागरूक आणि जाणकार मतदार होऊ या

## माहितीच्या आधारे योग्य उमेदवार निवडू या; विविध उपक्रमातुन मतदानासाठी जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर २४-सिंदखेडराजा मतदारसंघातील क्षेत्रामध्ये निवडणुकीसाठी नियोजनबद्ध तयारी चालू आहे, लोकशाहीचा हा उत्सव साजरा करण्यासाठी सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा येथे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आज विविध उपक्रमातुन मतदानासाठी जनजागृती करण्यात आली.

डतएएझ उपक्रमांतर्गत नगरपरिषद सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा, तहसील कार्यालय सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा, पंचायत समिती सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा तसेच सर्व शाळा महाविद्यालय यांच्या सहभागामधून आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता दोन्ही शहरातून भव्य




बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद गावातील नागरिकांकडून मिळाला आहे.

आजच्या या कार्यक्रमाच्या माध्यमातून काही संदेश मतदाराला देण्यात आला, सर्व उपस्थित अधिकारी कर्मचारी यांनी ऋज्ञ तजढए या नावाचे फलक घेऊन मतदान जनजागृती व्हावी अश्या आशायाचा संदेश मतदारांना दिला आणि मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मतदारांना आवाहन सुद्धा केले.

मतदारांना रंजकपने आणि उत्साहाने महत्वपूर्ण संदेश देण्यात आले त्यातील काही महत्वाचे वाक्ये पुढीलप्रमाणे,

गरीब-श्रीमंत, जात-धर्म-लिंग या भेदापासून दूर म्हणजे आपले मत, सर्वांना समान अधिकाराच्या तत्त्वाची प्रतिबिंब म्हणजे आपले मत

लोकशाहीतील समानतेचे ही मूल्य आपलं पहिलं मत, म्हणजे देशाच्या जडणवीतला पहिले योगदान, जागरूक आणि जाणकार मतदार होऊ या, माहितीच्या आधारे योग्य उमेदवार निवडून या

आजच्या या कार्यक्रमाला मा. तहसीलदार सिंदखेड राजा श्री अजित दिवटे, मा. तहसीलदार देऊळगावराजा वैशाली डोंगरजाळ, मा. मुख्याधिकारी देऊळगाव राजा नगरपरिषद अरुण मोकळ, मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री प्रशांत व्हटकर, मा. निवडणुक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री मनोज सातव, मा. निवडणुक नायब तहसीलदार देऊळगाव राजा श्री प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री प्रवीणकुमार वराडे, मा नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव तसेच इतर अधिकारी, कर्मचारी, शिक्षक उपस्थित होते.

त्यामध्ये श्री वाघमारे (गटशिक्षणाधिकारी), प्रसार माध्यम नोडल अधिकारी श्री अंकुश म्हस्के, नोडल अधिकारी श्री रंगनाथ गावडे, डतएएझ नोडल अधिकारी श्री मुसदवाले, विस्तार अधिकारी श्री दराडे, श्री सुरेश तायडे, श्री खरात, श्री राखोंडे, गैबीनंद घुगे, अरुण खेडेकर, कु. जाधव (केंद्रप्रमुख) दीपक गिते, मिरटकर, जिजामाता विद्यालय कर्मचारी व स्थानिक शाळांचे शिक्षकउपस्थित होते.

## लोहा येथे मतदान जनजागृती व मानवी साखळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोहा विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक स्वीप मतदान जनजागृती यादी व मानवी साखळी काढण्यात आली. मतदान जनजागृती रॅलीचे उद्घाटन निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी केले.यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठलराव परळीकर, रामेश्वर गोरे, नायब तहसीलदार रेखा चामनक, नोडल अधिकारी स्विप कक्ष सतीश व्यवहारे, संजय येरमे, शिक्षण विस्तार अधिकारी बी.पी.गुट्टे, सरस्वती आंबलवाड, अंजली कापसे, बाबुराव फसमले, केंद्रप्रमुख डी आर शिंदे, जी.एस .मंगनाळे, संतोष जोशी, सुभाष पानपट्टे, मुख्याध्यापक हेमंत कवर, पी.डी.पोले, सूर्यकांत लुंगारे, बापूराव राठोड, हनमंत पवार, गटसाधन केंद्र सिद्धार्थ सोनकांबळे, बाळू चव्हाण, संजय अकोले, आर वाय चव्हाण, संत गाडगे महाराज महाविद्यालय एनसीसी प्रमुख बी आर ठाकूर उपस्थित होते.मतदान जनजागृती रॅली एसटी बसस्थानक लोहा येथे आल्यानंतर बसस्थानकात मानवी साखळी करून मतदान जनजागृती घोषणा स्विप वाहनाद्वारे, जनजागृती नवनाथ बोळकेकर, शिवसांब गणाचार्य, बालाजी जंगापुरे, शांता एंगडे, अर्चना वावधाने यांनी केले. यावेळी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व संत गाडगे महाराज महाविद्यालयाचे एनसीसी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## डुबेरे विद्यालयाचे विद्यार्थी देणार बंगलोर येथील इस्रो संस्थेला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी:- मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी बंगलोर येथील इस्रो या वैज्ञानिक संस्थेला भेट देणार आहे . इस्रो या संस्थेला भेट देणारी जिल्ह्यातील पहिली एकमेव शाळा आहे

**जिल्ह्यातील एकमेव शाळा**

येथील दानशूर व्यक्ती व विद्यालयाचे माजी विद्यार्थी संदेश भगवान वाजे यांच्या दातृत्वातून ही वैज्ञानिक सहल संपन्न होणार आहे .विद्यालयातील १८ विद्यार्थी व ३ शिक्षक सहभागी होत आहे. विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे, उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे व उपशिक्षिका भारती निखाडे या वैज्ञानिक सहलीत सहभागी होणार आहे.त्यासाठी लागणारा अंदाजे ३ लाख रुपये खर्च हा येथील दानशूर व माजी विद्यार्थी संदेश भगवान वाजे हे करणार आहे .यापूर्वी देखील पुणे येथील आयसर संस्थेला भेट येणारा खर्च संदेश वाजे यांनी केला आहे. बंगलोर येथील इस्रो, पुणे येथील आयसर व मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च( टी आय एफ आर ) या संस्थानां भेट देणारी डुबेरे येथील जिल्ह्यातील ही एकमेव शाळा आहे.

येत्या १९ नोव्हेंबर रोजी विद्यार्थी व शिक्षक जाणार आहे . विद्यार्थ्यांना या वैज्ञानिक सहलीसाठी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांनी शुभेच्छा व आशीर्वाद दिले आहे . या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहेत. विद्यार्थ्यांना मविप्र संस्थेचे सरचिटणीस



ॲड. नितीनजी ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्कर ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने , शालेय समितीचे सदस्य अरुण वारुंगसे, शंकरराव वामने, सरपंच सागर वारुंगसे, शरद माळी, अर्जुन वाजे, अशोक गवळी, काशिनाथ आप्पा वाजे, भाऊ रखमा वारुंगसे, विजय दादा वाजे मोहन माळी, आणासाहेब वारुंगसे, बबनराव वाजे पालक- शिक्षक संघाचे उपाध्यक्ष माणिक वारुंगसे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मतदार ओळखीसाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य बाबींचा समावेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता जे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र (एझखउ) सादर करु शकत नाहीत असे मतदार त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त पुढीलप्रमाणे नमुद कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करु शकतील.

आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँकापोस्ट ऑफिसने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजने अंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रर जनरल ऑफ इंडिया यांचेद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्रराज्य सरकार/ सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना/आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे २४७-मोहोळ (अ.जा) विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## नळदुर्ग येथे महाविकास आघाडीचे उमेदवार धिरज पाटील यांच्या प्रचारासाठी अशोक भाऊ जगदाळे सह शेकडो कार्यकर्ते मैदानात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग महाराष्ट्रभर होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत २४१ विधानसभा मतदारसंघ निवडणुकांच्या रण धुमाळीत प्रचाराचा नारळ फुटलाच परंतू राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य कार्यकारणी सदस्य दृष्टी समुहाचे संस्थापक अशोक भाऊ जगदाळे हे प्रचाराच्या रणधुमाळी उतरले आसुन अशोक जगदाळे यांच्या कडे खुप मोठ्या प्रमाणात ओट बँक आसल्याचे बोलले जात आहे .

महाविकास आघाडीचा प्रचार व प्रसार माध्यमात राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य अशोक भाऊ जगदाळे यांनी उडी घेतल्या मुळे

महाविकास आघाडीचे पारडे जड आहे आसे बोलले जात आहे.

ही प्रचार रॅली बस स्थानक डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकातून सुरवात करण्यात आली नविपेठ , लोकमाता अहिल्यामाई होळकर चौक , शास्त्री चौक , भवानी चौक ब्राम्हण गल्ली , चावडी चौक ते धर्मविर संभाजी चौक , मराठा गल्ली , किल्लागेट , साठेनगर पोलीस ठाणे समोरून ऑफीस समोर समारोप करण्यात आला . यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार कुलदीप उर्फ भैया धीरज पाटील ,राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य कार्यकारिणी सदस्य अशोक भाऊ



जगदाळे माजी नगराध्यक्ष शहबाज काझी माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी , ड अरविंद बेडगे ,चंद्रकांत बनसोडे संदीप सुरवसे , जयवंत मुळे , अमृत पुदाले संजय मोरे , शिवय्या स्वामी , आनंद पुदाले धनराज गायकवाड , अभिजीत पुदाले , निरंजन कोप्पा पाटील संतोष पुदाले , शाम कनकधर सरदारसिंग ठाकुर , नवान काझी सोमनाथ स्वामी , सुहास पुराणिक , शिवसेनेचे नेते कमलाकर चव्हाण , राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष महेबूब शेख , नपचे माजी उपाध्यक्ष मुन्ना शेख , सोसायटीचे व्हाईस चेअरमन ताजोद्दीन सय्यद , धनजंय डुकरे , शैलेश डुकरे , नपचे माजी उपाध्यक्ष इमाम शेख कलीम शेख , तारेख काझी , फकरोद्दीन मुजावर , जाकेर जमादार , अखिल टेलर , अनवर पठाण , पखर सालार शान्ना काझी , फारुख काझी , कदरत शेख , आय्या कुरेशी ,आखलाख इनामदार , मुजाहीद काझी मौनोदीन शहर काझी आदी सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

**अभिजीत पाटील यांना आमचा सक्रिय पाठिंबा** — **अनिल सावंत यांची स्पष्टोक्ती**

## प्रा. शिवाजी सावंत यांची भूमिका सावंत परिवाराची नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिवाजी सावंत यांच्या भूमिकेचे आम्ही सहमत नाही . अभिजीत पाटील यांना आमचा सक्रिय पाठिंबा आहे. असे अनिल सावंत आणि परिवार यांचा पूर्ण पाठिंबा आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल सावंत यांच्या लिंक रोड पंढरपूर या ठिकाणी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

व दोन दिवसांपूर्वी प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी माढा विधानसभा मतदार संघामध्ये महाविकास आघाडीच्या विरोधात भूमिका घेतली होती पण महाविकास आघाडी कडून अभिजीत पाटील, आणि अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे रिंगणात आहेत.



माढा विधानसभा मतदारसंघ तसेच पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती या पत्रकार परिषदेसाठी माढा मतदारसंघातील सावंत परिवार व सावंत गटाचे सर्व नेते आणि त्यांचे सर्व नातेवाईकांनी त्यांची भूमिका मांडली.

अनिल सावंत आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणाले की. प्राध्यापक शिवाजी सावंत हे माझे काका आहेत दोन दिवसांपूर्वी त्यांनी अनपेक्षित पणे एक अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला. साहजिकच त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो मात्र आदरणीय प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी घेतलेली भूमिका ही त्यांची व्यक्तिगत भूमिका आहे.

त्यांच्या भूमिकेशी सावंत परिवार आणि त्यांच्या गटाचे कोणतेही कोणीही समजत नाही. परिवारातील सर्व सदस्यांचा अभिजीत पाटील यांना सक्रिय पाठिंबा आहे व माढ्यातून अभिजीत पाटील निश्चितपणे विजयी होतील असे त्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेमध्ये अनिल सावंत रवी सावंत विजय सावंत आणि सावंत परिवारातील सर्व इतर सदस्य ही उपस्थित होते.

## हिसका मारून मोबाईल चोरणारी टोळी केली जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) अलीकडे शहरात हिसका मारून मोबाईल चोरून नेणाऱ्या गुन्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती.दर दिवसागणित शहरात कुठे ना कुठे अशा घटना घडतच होत्या.या अनुषंगाने सोलापूर शहर गुन्हे शाखेने अशा गुन्ह्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपास सुरू केला आणि हिसका मारून मोबाईल चोरणारी टोळी जेरबंद केली आहे.

शहर गुन्हे शाखेकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथक यांनी अशा गुन्ह्यांची माहिती काढत असताना शंकर चंदुरसिंग मैनावाले (वय-२५ रा. बेडरपूल,सोलापूर),अजय मनोज जमादार (वय-२३,रा.बापूजी नगर, सोलापूर) व महेश हनुमान मौलावाले (वय-२३,रा.महात्मा फुले नगर,सिद्धार्थ चौक,सोलापूर) हे तिघे चोरीचे मोबाईल विक्री करण्याकरिता पोटफाडी चौक ते सिद्धार्थ सोसायटी रोडवर येणार असल्याची माहिती मिळाली.त्या अनुषंगाने सापळा लावून १५ नोव्हेंबर रोजी तिघांना ताब्यात घेतले असता चौकशीत त्यांनी १४ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल्स, दोन लॅपटॉप चोरली असल्याची कबुली दिली. पोलिसांनी हा सर्व ऐवज व गुन्ह्यात वापरत असलेली मोटार सायकल असा एकूण २ लाख १३ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या तिघा चोरट्यांनी सदर बझार,जेलरोड या हद्दीत चोरी केल्याची कबुली दिली.या चोरट्याकडून विवो कंपनीचे ६, लावा कंपनीचा १, सॅमसंग कंपनीचा ४, रेडमी कंपनीचा १, ओप्पो कंपनीचा १ कंपनीचा १ असे मोबाईल तसेच लॅपटॉप व टॅब चोरले.याशिवाय हा गुन्हा करण्याकरिता त्यांनी एक मोटरसायकल ही चोरली होती.तो सर्व ऐवज जप्त करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार,पोलीस उपायुक्त दिपाली काळे,साह पोलीस आयुक्त राजन माने, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे,यांच्या मार्गदर्शनाखाली साह. पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक, पोलीस हवालदार अंकुश भोसले,शैलेश बुगड,राजकुमार वाघमारे,अभिजीत धायगुडे,दत्तात्रय सूळ,अजय गुंड,प्रकाश गायकवाड,मच्छिंद्र राठोड,वसीम शेख,सतीश काटे,बाळू काळे या पथकाने पार पडली.